# प्रकरण पाचवे

## गोखले यांचे आर्थिक विचार

## प्रकरण पाचवे

## गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार

### प्रस्तावना :

अर्थकारण आणि संसदीय कार्य या दोन्ही कार्यात निपुण असलेल्या व्यक्ती भारतात फारच थोडया झाल्या आहेत. कांही देशात शिक्षण आणि राजकारण या क्षेत्रातील प्रभावी समाजधुरीणांनी अर्थशास्त्रातील नैपुण्याला राजनीतीच्या कुशलतेची जोड देण्याचे काळजीपूर्वक प्रयत्न केले आहेत. स्वीडनमध्ये ही परंपरा विशेष प्रामुख्याने दिसून येते. पार्लमेंटच्या सभासदांपैकी अनेकजण अर्थकारणातही पारंगत असल्याबद्दल तो देश प्रसिध्द आहे. भारतात ज्यांनी आधुनिक भारतीय अर्थकारणाचा पाया घातला ते शैक्षणिक आणि राजकीय त्या दोन्ही क्षेत्रात सारखेच निपुण होते. त्या पुरूषांमध्ये गोपाळ कृष्ण गोखले यांची गणना होते. नंतरच्या काळात मात्र हा सुंदर मिलाफ कमी प्रमाणात आढळतो. लोकवित्त आणि संसदीय कार्य त्या दोन्ही क्षेत्रांत श्री. गोखले यांनी सारखेच प्राविण्य संपादन केले होते. अर्थसंकल्पाच्या वेळी केलेल्या भाषणातून त्यांचे हे प्राविण्य विशेष प्रकर्षाने दिसून येते.

गोखले यांनी आपल्या भाषणातून भारताच्या आर्थिक विकासाची जी एक योजना मांडली. ती आजच्या प्रश्नांचे वास्तव स्वरूप समजावून घेण्यास आणि त्यांची उकल करण्यासही उपयुक्त आहे. देशाच्या आर्थिक जीवनात सरकारने कोणती भूमिका घ्यावी त्याविषयीच्या गोखल्यांच्या काळातील कल्पना आजच्या काळाच्या मानाने फारच मर्यादित होत्या. आजच्या काळात राष्ट्राच्या आर्थिक विकासाची जबाबदारी मुख्यत: सरकारची आहे असे समजले जाते.

गोखले हे पहिले आधुनिक भारतीय विचारवंत म्हणून ओळखले जातात.[१] १९व्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या सुरवातीच्या काळात भारतीय अर्थशास्त्र विचाराचा पाया घालणाऱ्या विचारवंतांपैकी गोखले हे एक होत.[२] त्यांनी मुख्यत: लोकवित्त आणि अर्थनीती ह्या विषयात मौलिक विचारांची भर घातली. ह्या विषयावरील त्यांचे विचार जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

## १९०२ ते १९१२ च्या भारतीय अर्थसंकल्पाचे स्वरूप :

गोखल्यांची वरिष्ठ कायदेमंडळातील सर्वश्रेष्ठ व अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांची अर्थसंकल्पावरील भाषणे होत. सरकारचे अंदाजपत्रक वाचून झाले की, हा आकडेबहाद्दर त्यावर अशी कांही टीका करी की, सरकारास तोंड उघडता येवू नये. गोखल्यांचे अंदाजपत्रकावरील पहिले भाषण १९०२ मार्चमध्ये झाले.[3]

अंदाजपत्रकावरील चर्चेस आरंभ करताना दरवर्षीप्रमाणे सारे कांही सुरळीत व गोडीत पार पडेल अशीच सरकारपक्षाची अपेक्षा होती. गेल्या वर्षाच्या अंदाजपत्रकात सात कोट रु. शिल्लक दाखविली होती. याबद्दल फायनान्स मेंबर सर एडवर्ड लॉ यांचे सर्वांनी कौतुक केले. सरकारी अंमलदार सभासद, बिगर सरकारी युरोपियन सभासद आणि कांही हिंदी सभासद यांनी स्तुतिसुमने उधळण्यातील आपापला वाटा उचलला. दरभंग्याचे महाराज म्हणाले, "लाटसाहेब, अंदाजपत्रकावरून देशाची जी भरभराटीची आर्थिक अवस्था समोर आली आहे त्यामुळे साऱ्या देशात मन:पूर्वक समाधानाची भावना सर्वत्र आढळून येत आहे, हे मी आपणास सांगायला हवे असे नाही." मध्य प्रांताच्या वतीने बी.के.बोस यांनी सरकारचे कृतज्ञभावे आभार मानले आणि स्वत:चाही "आनंद व कृतज्ञभाव" व्यक्त केला. येथपर्यंत ठरलेल्या चाकोरीतून बैठकीच्या कामकाजाचा गाडा चालला. गोखल्यांच्या भाषणाने मात्र तो एकाएकी चाकोरीबाहेर फेकला गेला.

गोखले आपल्या भाषणात म्हणाले, "सुधारित अंदाजानुसार गेल्या वर्षी जी प्रचंड शिल्लक दिसून येते आहे तिच्यासाठी नामदार फायनान्स मेंबर यांना

सर्वजण धन्यवाद देत आहेत. स्तुतीच्या या वर्षावात माझी सदसद्विवेकबुध्दी मला सहभागी होवू देत नाही, ही माझी अडचण आहे." "हिंदुस्थान सरकारच्या लागोपाठच्या शिलकी अंदाजपत्रकावरून देशाची स्थिती आणि देशाच्या जमाखर्चाची स्थिती यांच्यात योग्य स्वरूपाचा परस्पर सत्संबंधाचा पूर्ण अभाव आहे. हाच निष्कर्ष अटळपणे सामोरा येतो. (ही शिल्लक) हा....... समाजाचा घोर अपराध आहे..... गंभीर मंदीच्या आणि हालअपेष्टांच्या या काळात लोकांकडून सरकारने इतका जास्त वसूल गोळा करावा, इतकी शिल्लक पडावी, हाच मूलत: एक अपराध होय." ४

गेल्या सोळा वर्षांमध्ये उत्पन्नावरील कर, मिठावरील कर, जकात आकारणी, कपाशीवरील जकात यात वाढ होत गेल्याचे, इतकेच नाही तर देशाच्या विस्तीर्ण भागांमध्ये अवर्षण व दुष्काळाची परिस्थिती असूनही जमीन महसुलाचीदेखील वसुली वाढत गेल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. "दारिद्र्याने पीडित लोक आणि ओसंडून वाहणारी तिजोरी" या वरकरणी विरोधाभासाकडे त्यांनी लक्ष वेधले. करांचे ओझे कमी करावे, मीठावरील करात कपात करावी, उत्पन्नावरील कराच्या बाबतीत किमान करयोग्य उत्पन्न पातळी वर्षाला हजार रुपयांपर्यंत वर न्यावी, अशी त्यांनी मागणी केली. सुती धाग्यावरील जकात रद्द करावी, असे त्यांनी सुचविले. कराचे ओझे या प्रकारे कमी केले तरी खर्चापेक्षा उत्पन्न अधिक राहील, व अंदाजपत्रक शिलकीच राहील, आणि त्यामुळे सरकारला कर कमी करणे परवडणारे आहे, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले.५ शिक्षणासाठी, विशेषत: धंदेशिक्षणासाठी आणि उद्योगधंद्याच्याविकासासाठी सरकारने अधिक रकमेची तरतूद करावी अशी त्यांनी आवर्जून मागणी केली. हिंदुस्थानात धंदे शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींनी निश्चित योजना सादर करावी असे आव्हान अध्यक्ष व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनी दिले होते. त्या आव्हानाला प्रत्युत्तर देत गोखले म्हणाले, "आमच्याच खांद्यावर ही जबाबदारी कशी काय टाकली जावू शकते ते मला कळत नाही. सरकारच्या हाताशी सर्व प्रकारची

साधने आहेत आणि आवश्यक तो तज्ज्ञ सल्ला ते सहजी प्राप्त करू शकते."
गोखल्यांनी अशी शिफारस केली की, जाणकार इंग्लिश व हिंदी माण-
सांची एक लहान समिती नेमली जावी, आणि तीने परदेशाचा, विशेषत:
जपानचा, अभ्यास दौरा करावा. विशेष करून जपानचा दौरा सुचविण्याचे
कारण असे की, धंदेशिक्षण व उद्योगधंदे यात जपानने लक्षणीय प्रगती केली
होती.

लष्करावरील खर्च कमी केला तर एकीकडे करांचे ओझे कमी करूनही,
दुसरीकडे, देशबांधणीच्या कार्यावर अधिक पैसा खर्च करणे शक्य होईल,
असा गोखल्यांचा युक्तीवाद होता. जोपर्यंत मी व्हाइसरॉयपदी आहे तोपर्यंत
सैन्यामध्ये कपात अजिबात विचारात घेतली जाणार नाही, असे लॉर्ड कर्झन
यानी जाहीरपणे सांगितले होते. हिंदुस्थान सरकारची जर ही अटळ भूमिका
असेल तर "हिंदुस्थानमधील सैन्यावर होणाऱ्या खर्चाचा कांही भाग इंग्लिश
जमाखर्चामध्ये समाविष्ट करणे शक्य होणार नाही काय ? हिंदुस्थानवर
ब्रिटिश राज्य कायम राहावे यामध्ये आमचा जसा हितसंबंध आहे तसा इंग्लंडचा
पण नाही काय ?" असे प्रश्न त्यानी उपस्थित केले.[६]

अंदाजपत्रकांतील तरतुदी व आकडेवारी यांची चिकित्सा करून झाल्यावर
सरकारी धोरणावरील टीकाटिप्पणीकडे ते वळले. हिंदुस्थानचे आर्थिक व्यवहार
ज्या प्रकारे हाताळले जातात त्यावरून हिंदुस्थानच्या हितसंबंधापेक्षा इंग्लंडच्या
परदेशीय हितसंबंधाना अग्रहक्क देण्यात येतो. या मताला पुष्टी मिळते, हिंदु-
स्थानच्या सरहद्दीबाहेर, ब्रिटनचे साम्राज्य वाढविण्यासाठी प्रचंड रकमा खर्ची
पडल्या होत्या. या देशाला त्यापासून कोणताच लाभ झालेला नव्हता.
अशाप्रकारे सरकारी धोरणावर टीका केली.[७]

जकातीचे वाढते उत्पन्न लोकांची भरभराट झालेल्या आर्थिक स्थितीचे
निदर्शक आहे, हा फायनान्स मेंबरांचा दावा त्यांनी खोटा ठरविला. साखर,

तलम कापड, आणि चांदी यांची आयात आणि सर्वसाधारण जनतेची सार्वजनिक दुष्काळामुळे झालेली हलाखीची परिस्थिती यांचा कांही संबंध नव्हता. गोखल्यांच्या मते दोनच कर असे होते की ज्याच्या आधारे लोकांच्या स्थितीची कल्पना केली जावू शकते. एक म्हणजे आयकर, जो उच्च व मध्यम वर्गाच्या स्थितीचा निदर्शक असतो आणि दुसरा मिठावरचा कर, जो सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या स्थितीचा निदर्शक मानता येतो. या दोन्ही करातून जमा होणारी रक्कम तेवढीच राहिली, याचा अर्थ हिंदी अर्थव्यवस्थेची प्रगती खुंटलेली आहे.[८] हिंदुस्थानच्या आर्थिक स्थितीवरून झालेल्या वादाचा उल्लेख त्यांनी केला. दादाभाई नौरोजी यानी दरडोई उत्पन्न १९/- रु. असल्याचा हिशेब मांडला होता. यावर दरडोई उत्पन्न रु.३०/- आहे. दादाभाईंचा हिशेब चूक आहे असे लॉर्ड कर्झन यांनी ठासून सांगितले होते. दरडोई उत्पन्नाविषयीचे अंदाजी आकडे काढून उभे केले जाणारे परिस्थितीचे चित्र "आकडेशास्त्रीय" म्हणजे शास्त्रीयतेचा आभास निर्माण करीत असले तरी, परिस्थितीमधील गतिमान वास्तवता अशा चित्रात पकडली जात नाही, हे तर आहेच, पण लॉर्ड कर्झन यांच्या हिशेबाप्रमाणे दरडोई उत्पन्न ३०/- रु. मानले तरी, हा आकडा अगदीच दयनीय नव्हता का ? असा प्रश्न गोखल्यांनी केला. मिठाचा खप, शेतीचे उत्पन्न, आयात-निर्यात यांचे आकडे गोखल्यांनी स्पष्ट केले आणि असे सुचविले की, लोकांच्या स्थितीमध्ये भरभराट होत नव्हती, लोकांची स्थिती उलट खालावत असल्याचे ते आकडे निदर्शक होते.[९] २६ मार्च, १९०२ रोजी गोखल्यांनी अंदाजपत्रकावरील चर्चेच्या वेळी केलेल्या भाषणाने साऱ्या हिंदी शिक्षित वर्गात चैतन्य निर्माण झाले. बहुतेकांचे मनोगतच "अमृत बझार पत्रिके"च्या पुढील संपादकीयामधून व्यक्त झालेले आढळते.

"सरकारच्या जमाखर्चाच्या अंदाजपत्रकांवर एकादा हिंदी सभासद उघडपणे व निर्भयपणे टीका करीत असलेला पाहण्याची आकांक्षा आम्ही आज

अनेक दिवस उराशी बाळगली होती. आजवर आमचे समाधान कधी झाले नव्हते. कांही वेळा सभासदांच्या ठिकाणी ही क्षमता असूनही आवश्यक ती हिंमत त्यांच्या ठिकाणी नसे आणि ज्यांच्यापाशी हिंमत होती, त्यांच्यापाशी पात्रता नव्हती. ब्रिटिश राजवटीच्या इतिहासात प्रथमच सरकारी आटाव्यांचे आणि अंदाजपत्रकाचे मायाजाल भेदून त्यांचा पोकळपणा उघड करणारा, आणि तोही रोखठोकपणे उघड करणारा हिंदी सुपुत्र आज अवतरला आहे." [१०]

अर्थसंकल्पावरील भाषणामुळे मित्राकडून तसेच वाहत्याकडून येणाऱ्या अभिनंदनाच्या पत्रांची रीघच लागली. दक्षिण आफ्रिकेहून कांही दिवसासाठी हिंदुस्थानात आलेल्या मो.क. गांधींचे पत्रही त्यात होते. एक तरुण सनदी अंमलदार अकबर हैदरी आणि त्यावेळी फार कोणास परिचित नसलेले पण पुढे प्रख्यात झालेले पत्र पंडित सी.वाय्. चिंतामणी यांचीही पत्रे त्यात होती. ज्येष्ठ निवृत्त सनदी अंमलदार व आर्थिक इतिहासकार रोमेशचंद्र दत्त यांना तर आनंदाचे भरते आले. त्यानी ८ एप्रिल १९०२ रोजी गोखल्यांना लिहिले,

> "उगाच कोणाची स्तुती करावी असा माझा स्वभाव नाही. जेवढे मनात असते तेवढेच मी लिहितो. व्हाइसरॉयच्या कौन्सिलमध्ये राष्ट्रवादी भूमिकेतून अंदाजपत्रकांवर आजवर केल्या गेलेल्या भाषणांमध्ये तुमचे भाषण सर्वोत्तम झाले.
>
> तुमच्या युक्तिवादातील तर्क चोख आहे. तुमचे निष्कर्ष म्हणजे घणाघाती घावच आहेत. तुम्ही ते इतक्या ताकदीने केलेले आहेत की ते परतवून लावणे अशक्य आहे. तुम्ही घातलेल्या घावांनी सरकारी पटपटांचा पार चुराडा होऊन जातो.

> व्हाईसरॉय हे एक कमालीचे आत्मविश्वास संपन्न, कर्तृत्ववान, समर्थ व उद्दाम व्यक्तित्व आहे.... अधिक बलदंड शक्ती लोकहिताच्या बाजूने आता उभ्या राहत आहेत, ही भावना त्यांच्या मनात आज घर करून असेल... दहा वर्षांनी आजच्यापेक्षाही या शक्ती अधिक बलवान झालेल्या असतील. हिंदुस्थानात देशकार्य करीत असलेली सर्व नामवंत मंडळी माझ्या परिचयाची आहेत. त्या सर्वांना डोळ्या-समोर ठेवून असे भाकीत करण्याचे मी धाडस करतो की, त्या सर्वां-मध्ये तुम्ही सर्वांत समर्थ, सर्वांत अग्रगण्य आणि सर्वांत प्रभावी पुढारी व्हाल. कारण देशाविषयी पूर्ण सच्ची उत्कट भक्ती तुमच्या ठिकाणी वास करीत आहे, तुम्हाला प्रेरणा देत आहे."[११]

वर्णद्वेषाने वा पूर्वग्रहांनी ज्यांना आंधळेपणा दिलेले नव्हते अशा विचारी युरो-पियनांनी, इंपीरिअल कौन्सिलच्या या सर्वांत तरुण सभासदाच्या अंगचे गुण चटकन हेरले. लंडनहून केन यांनी लिहिले की, ब्रिटिश वृत्तपत्रांनी गोखल्यांच्या भाषणाला चांगली प्रसिद्धी दिली होती. "टाइम्स ऑफ इंडिया"चे संपादक एल्.जी. फ्रेझर हे गोखल्यांच्या सर्व मुद्यांशी सहमत नव्हते. तरी पण "गोख-ल्याइतका अभ्यासू, बुद्धिमान व व्यक्तित्वसंपन्न प्रतिनिधी आपणास मिळाला, याचा पश्चिम हिंदुस्थानला वाटणारा अभिमान त्यांनी प्रकट केला.

इंपीरिअल कौन्सिलमध्ये गोखल्यांनी जी छाप पाडली तिचे सर्वांत उत्तम रेखाटन कलकत्त्याहून प्रकाशित होणाऱ्या "इंडियन डेली न्यूज" या ब्रिटिश मालकीच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले.

> "मुंबई इलाख्यातून आलेल्या मि. गोखल्यांनी सरकारच्या जमाखर्चाच्या संपूर्ण अंदाजपत्रकांवरच सपासप उभे-आडवे, वार करणारा जोरदार हल्ला चढवला. भारदस्त प्रकृतीच्या या सभागृहामध्ये बॉम्बस्फोट झाला असता तर वाटले असते त्यापेक्षा अधिक आश्चर्य त्यांच्या भाषणाचे वाटले. तरुणांच्या बेधडकपणे मि. गोखले यांनी...

डिग्बी संप्रदायाची मते अतिशय सुस्पष्टपणे विशद केली. इंग्लिश भाषेवरील त्यांचे प्रभुत्व, त्यांची शब्दांची सफाईदार फेक आणि त्यांचा मुद्देसूद युक्तिवाद यांमुळे त्यांचे भाषण ऐकणे हा एक सुखद अनुभव होता.[१२]

गोखल्यांच्या भाषणावरील सरकार पक्षाची प्रतिक्रिया संमिश्र स्वरूपाची होती. सरकार पक्षाला त्यांच्या भाषणाची कटकटही वाटली आणि या भाषणामुळे गोंधळल्यासारखेही झाले. मुंबईच्या "नामदार सभासदांनी" जे अनेक प्रश्न उपस्थित केले, त्यांची उत्तरे तयार करण्यास आपणास पुरेसा वेळ मिळाला नाही, ही गोष्ट फायनान्स मेंबर सर एडवर्ड लॉ यांनी प्रांजळपणे कबूल केली. कर्झन यांनी गोखल्यांच्या युक्तिवादाचा प्रतिवाद केला नाही. त्यांनी एक अतिशय उथळ शेरा मारला. ते म्हणाले, "कोणत्याही युरोपीय देशात सन्माननीय सभासद कांही काळ जाऊन राहतील तर थोड्याच कालावधीत, कारभाराच्या विषयासंबंधी वेगळी मते घेऊन ते परततील." दुसऱ्या दिवशी, २७ मार्च १९०२ रोजी, भारतमंत्री लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांना लिहिलेल्या गोपनीय पत्रात कर्झन यांनी मुंबईच्या मि. गोखल्याविषयी लिहिले, "नाणेविषयक व करविषयक धोरणांवर राष्ट्रसभा छाप अतिरेकी टीका आपल्या जहाल भाषणात त्यांनी केली. त्यांच्या टीकेला उत्तर द्यायला मला एक तास सवड मिळू शकली असती तर बरे झाले असते. पण अर्थात इतका दारुगोळा खर्च करावा एवढी त्यांच्या युक्तीवादाची लायकी नव्हती."

मात्र गोखल्यांच्या युक्तिवादास अशा तुच्छभावाने लेखणे कर्झन यांना फार काळ जमले नाही. कर्झन हे स्वत: मोठे कर्तबगार व बुध्दिमान गृहस्थ होते. इतरांच्या ठिकाणचे गुण ओळखणे आणि कधी कधी त्यांचा गौरव करणे त्यांना जमत असे. पुढच्या वर्षी २५ मार्च, १९०३ रोजी, अंदाजपत्रकांवरील चर्चेचा समारोप करताना, गोखल्यांच्या भाषणाला उद्देशून "नेहमीप्रमाणेच त्यांचे भाषण उच्च प्रतीच्या गुणवत्तेचे झाले." असे उद्गार कर्झन यांनी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

काटले.[१३] उच्चपदस्थ मंडळी गोखल्यांच्या भाषणानंतर किती आदराने वागू लागली होती याची कल्पना एप्रिल १९०२ रोजी घडलेल्या एका प्रसंगावरून चांगली येते. पुण्याहून नागपूरला जाण्यासाठी आगगाडीत चढत असतांना लेफ्टनंट गोल्डिंगहॅम नावाच्या एका तरुण ब्रिटिश लष्करी अधिका-यांने गोखल्याशी अत्यंत उध्दटपणे वर्तन केले. गोखल्यांना तो पहिल्या वर्गाच्या डब्यात बसू देत नव्हता. गाडी जशी सुटली, आणि डब्यातील आपल्या-बरोबरचे प्रवासी इंपीरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद असल्याचे गोल्डिंगहॅम यांना समजून आले तेव्हा त्यांनी माफी मागितली. गोखल्यांच्या दृष्टीने गोष्ट तेथेच संपली. पण या घटनेला वृत्तपत्रांतून प्रसिध्दी मिळाली. तेव्हा मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड नॉर्थकोट यांनी तत्परतेने खेद प्रदर्शित केला. या घटनेची निर्भर्त्सना नॉर्थकोट यांनी करावी याला तशीच कारणे होती. या पुढच्या काळात राजकीय मंचावर गोखल्यांचे स्थान आणखी उंचावणार याची त्यांना खात्री पटली असल्यामुळे गोखल्याशी मैत्री करण्यास ते उत्सुक होते.

१९०३ सालच्या अर्थसंकल्पावरील भाषणात गोखले म्हणाले, "१८९८ आणि १९०३ दरम्यानच्या काळात विनिमयाच्या दरवाढीमुळे सरकारचे २२ कोटी रु. वाचले आहेत हे जरी खरे असले तरी त्या त्या वर्षीच्या उत्पन्नातून सरकारने ११ कोटी रु. विशेष बाबीवर खर्च केले आहेत. ना. गोखले यांच्या मताप्रमाणे खरी वाढ ३३ कोटी रूपयांची हवी होती.[१४] सरकारजवळ एवढी मोठी शिल्लक असल्यामुळे सरकारने मीठावरील कर कमी करावा, प्राप्तीकर सूट मर्यादा ५००/- रु. ची १०००/- रु. करावी व सुतावरील जकात कमी करावी. त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पात मिठावरील कर थोडा कमी झाला, इतर दुसरे कर कमी झाले. परंतु सुती कापडावरील जकात मात्र कमी झाली नाही. गोखल्यांच्या तीन मागण्यापैकी दोन सरकारने मान्य केल्या. याला कारण केवळ गोखल्याचे असाधारण वक्तृत्व व आपली बाजू मांडण्याचे कौशल्य हेच होय. अर्थात काँग्रेसने हीच मागणी वारंवार केली होती, ही गोष्ट वेगळी.

सुती कापडावरील जकातीबाबत भारत सरकार ब्रिटिश हितसंबंधाचे हस्तक होते, हीच खरी व मूळ अडचण होती. मँचेस्टर व लँकेशायर येथील कापड धंद्याचा फायदा व्हावा म्हणून खुल्या व्यापाराचे धोरण सरकारने अंगिकारले होते. तरी सुध्दा भारतीय कापडधंद्याला कांही थोडासा फायदा होत होता. पण हा फायदा सुध्दा त्याला न मिळावा यासाठी जकात बसवून सरकारने इंग्लंडमधील धंदा व भारतीय कापडधंदा एका पातळीवर आणून ठेवला होता.

वास्तविक भारतीय कापडधंदा हा बाल्यावस्थेत होता व कोणतेही लोकानुवर्ती सरकार असते तर त्याने त्या धंद्याला संरक्षण देणारे उपाय योजले असते. त्याही दिवसांत भारतातून इंग्लंडात धान्य जात असे. पण म्हणून कांही इंग्राज सरकारने स्थानिक अन्नधान्यावर अंतर्गत कर बसवला नव्हता. हा सर्व व्यवहार केवळ अन्यायाचा होता.[१५]

१९०३ सालच्या अर्थसंकल्पावरील भाषणांत गोखल्यांनी दुसऱ्याही महत्त्वाच्या गोष्टींची चर्चा केली. त्यामध्ये अमर्याद वाढलेला लष्करी खर्च, सनदी नोकरांना वागविण्यातील भेदभाव, प्राथमिक शिक्षणाची हेळसांड या गोष्टी प्रमुख होत्या. बेसुमार लष्करी खर्च सर्व शिल्लक खाऊन जाई. गोखल्यांचा दावा असा की, भारतीय अर्थसंकल्प लष्करी बाबी विचारात घेऊनच तयार केला जातो. यामुळे दूरगामी व दृढ अशा कोणत्याच लोकोपयोगी योजना सरकारला हाती घेता येत नाहीत. सरकारचे उत्पन्न जोवर लष्करावरच अधिकाधिक खर्च होत आहे, तोपर्यंत लोकांचा भौतिक व नैतिक विकास घडवून आणणे केवळ अशक्य आहे. आणि असे असूनही प्रजेची स्थिती सुधारते आहे, हे केवळ ब्रिटिश सरकार आग्रहाने प्रतिपादित आहे हे दाखविताना गोखल्यांचे कौशल्य प्रत्ययास आले. भारत सरकार दर भारतीय मुलांच्या शिक्षणावर केवळ आठ पेन्सच खर्च करते, परंतु इंग्राज सरकार इंग्लंडमधील

मुलावर ६० पेन्स खर्च करते, ही गोष्ट गोखल्यानी आपल्या भाषणात स्पष्ट केली.[१६] देशात साडेपाच लाख खेडी असून त्यापैकी अनेक गावात प्राथमिक शिक्षणाची सोय नव्हती. तसेच प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी सरकार किती कमी खर्च करते ते त्यांनी इतर देशाबरोबर तुलना करून सरकारच्या निदर्शनास आणले.[१७]

सन १९०४ च्या अर्थसंकल्पावरील भाषणात त्यावर्षी वाढविण्यात आलेल्या लष्करी खर्चावर गोखल्यांनी टीका केली. आंग्लपुत्रांना सैन्यात दाखल होण्यास आग्रह केला जात असे पण हिंदू लोकांना मात्र सैन्यात दाखल करून घेतले जात नाही असेही त्यानी निदर्शनास आणून दिले.[१८]

या अर्थसंकल्पात सूक्ष्म पृथक्करण करण्याच्या गोखल्यांच्या असाधारण प्रतिभेला फारसा वाव नव्हता. त्या वर्षी ६.७२ कोटी रु. ची शिल्लक अर्थसंकल्पात दाखविली होती. त्यापैकी २.६५ कोटी रुपये प्रांतिक सरकारना विशेष मदत (ग्रँट) म्हणून देण्यात आले होते. भारतीय अर्थव्यवस्थेत एवढी प्रचंड शिल्लक आजपर्यंत कधीच दिसली नव्हती. म्हणून त्याच्या आधीच्या पाच-सहा वर्षांचे ताळेबंद गोखल्यानी तपासून पाहिले. त्याच्या आधीच्या चौदा वर्षांत एकूण शिल्लक साडे सतरा कोटी रुपये तर एकूण तूट साडे एकोणीस कोटी रुपयाची होती. परंतु १९०४ पूर्वीच्या सहा वर्षांत हीच शिल्लक एकोणतीस कोटी रुपये एवढी वाढली होती. अर्थातच ही वाढ केवळ हुंडणावळीचा दर वाढल्यामुळे सरकारला दाखविता आली होती. रुपयाचा दर १३ पेन्सापासून १८ पेन्सापर्यंत वाढल्यामुळे ५ कोटी रुपयांची बचत झाली. अफूवरील कराचे उत्पन्नही पुष्कळ वाढले होते. ५ कोटीवरून ते ८ कोटी रुपयापर्यंत गेले होते. त्यामुळे १९०४ साली होम चार्जेसवर ५ कोटींची बचत व अफूवरील कराच्या उत्पन्नात ३।। कोटीची भर अशी एकूण ८।। कोटी रुपये शिल्लक पडली होती. यांतून मिठाच्या करांतील मणामागे आठ आणे कपात व प्राप्तिकरांतील घट यामुळे

उत्पन्न दोन कोटी रुपये कमी झाले. तरी साडेसहा कोटी रुपये शिल्लक दाखवता आली होती.[१९]

ना. गोखल्यांनी रुपयाच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे नित्योपयोगी वस्तूंचे भाव भरमसाठ वाढू लागले आहेत ही गोष्ट सरकारच्या नजरेला आणली. आणि म्हणून मिठावरील कर दर मणी आणखी आठ आणे कमी करावा आणि सुती कापडावरील जकात रद्द व्हावी अशी मागणी पुन: एकदा गोखल्यांनी केली. शिवाय मुंबई, मद्रास व वायव्य सरहद्द प्रांत यात जमिनीच्या महसुलातही कपात करावी अशी एक नवी सूचना त्यांनी यावेळी मांडली. आधीच अवर्षण व दुष्काळ यांनी त्या प्रांतातील लोक हैराण झाले असल्याने सरकारी महसुलाने ते कसे जेरीस आले आहेत हे त्यांनी सरकारला दाखवून दिले. वस्तूंच्या किंमती सतत वाढत आहेत. यावरून लोक अधिक खरेदी करू लागले आहेत असा निष्कर्ष काढता येईल. पण तो बरोबरच असेल असे नाही. मालाचा तुटवडा हे त्याचे कारण आहे असेही म्हणता येईल. अगदी गरीब व आदिवासी लोकांत दारूचे व्यसन फार बोकाळल्यामुळे त्यांची अत्यंत दुर्दशा झाली होती. ही गोष्ट सरकारने लक्षात घ्यावी व यावर उपाय म्हणून संपूर्ण दारूबंदीचे धोरण अंमलात आणावे असे गोखल्यांनी सांगितले. या भाषणात आयात-निर्यात धोरणाचाही गोखल्यांनी उल्लेख केला.[२०]

१९०५ मध्ये व्हाईसरॉय तेच म्हणजे लॉर्डकर्झनच असले तरी वित्तविषयक सभासद बदलले होते. सर एडवर्ड लॉ जाऊन त्यांच्या जागी सर एडवर्ड बेकर आले होते. या वर्षीचे अंदाजपत्रकही शिलकी अंदाजपत्रक होते. तत्त्वांची पकड आणि विषयाची नक्की मांडणी या गोष्टीबद्दल नव्या वित्तविषयक सभासदांचे ना. गोखल्यानी अभिनंदन केले. अर्थसंकल्पात शिलकेपैकी पावणेचार कोटी रुपये, कर कमी करण्याकडे व लोकांची सुधारणा करण्याकडे वापरण्यात

येणार आहेत ही गोष्ट लोकांना फार संतोषाची वाटते असे गोखल्यांनी त्यांना कळविले. मिठावरील कर दर मणी आणखी आठ आण्यांनी कमी केला होता, या गोष्टीचे गोखल्याना समाधान नव्हते असे नाही. पण त्याना तो कर आणखी कमी व्हावयास हवा होता. त्या वर्षी दुष्काळ पट्टी रद्द करणे, पोस्टाचे दर कमी करणे आणि पोलीस दलातल्या खालच्या वर्गातील नोकरांचे पगार वाढविणे, या आणखी गोष्टी अर्थ-संकल्पात होत्या. ३५ लाख रुपये कृषीविषयक संशोधनासाठी व प्राथमिक शिक्षणासाठी प्रांतिक सरकारांना दिले होते. त्याचप्रमाणे जिल्हा लोकल बोर्डांना वीस लाख रुपये दिले होते.

मागील सात वर्षात नाणी पाडल्यामुळे होणारा साडेबारा कोटी रुपये फायदा वगळून सुद्धा, एकूण शिल्लक साडेबत्तीस कोटी रुपये राहते या गोष्टीकडे गोखल्यांनी आपल्या त्या वर्षीच्या भाषणात सरकारचे लक्ष वेधले. सरकारनेती शिल्लक सुवर्ण गंगाजळीसाठी ठेवली तर असो, पण त्याच अंदाजपत्रकांत लष्करी खर्च बेसुमार वाढला आहे ही गोष्ट त्यांना रूचली नाही. सर्वसाधारणपणे प्रतिवर्षी होणाऱ्या सरकारी कर्जफेडीसाठी या शिलकेतून पाच कोटी रुपये इतकी रक्कम वापरली जावी या गोष्टीला त्यांनी हरकत घेतली. त्यांचे म्हणणे असे की, शिल्लक रक्कम लोकाना सुधारण्या-साठी सरकारने वापरावी, कर्जफेडीसाठी नव्हे. ज्या बाबींवर पुन: पुन्हा खर्च करावा लागत नाही अशा गोष्टींवर वार्षिक उत्पन्नातून खर्च केला जावू नये, या तत्त्वावर त्यांचे म्हणणे आधारलेले होते.

राष्ट्रीय विकासापेक्षा वेगळ्या कारणांसाठी त्यावेळच्या भारत सरकारने लोकांकडून कर्जे घेतली होती. सरकारच्या भारतातील व बाहेरील लष्करी खर्चासाठी ती काढलेली होती. त्यामुळे गोखल्याचे म्हणणे रास्त होते. पण ही कथा तेथेच संपत नव्हती. सैन्याच्या पुनर्रचनेसाठी त्या

वर्षीच्या अर्थसंकल्पात ३ कोटी ६६ लक्ष रुपये दाखविण्यात आले होते. यापुढील प्रत्येक वर्षी हा लष्कर सुधारणा खर्च तीन कोटी रुपये होतच राहणार होता. हा खर्च अनावश्यक व अनधिकृत आहे हे दाखविताना गोखल्याची वाद्पटुता दिसून आली. या देशातील आपले स्थिर आसन लष्करी बळावर अवलंबून आहे, हे सरकार जाणून असल्यामुळे आपले लष्कर जास्तीत जास्त बळकट व अभेद्य राखणे सरकारला आवश्यक वाटत होते. शिवाय कित्येक प्रांतातून जमीन महसूलात असह्य वाढ झाली आहे या गोष्टीकडेही गोखल्यांनी सरकारचे लक्ष वेधले.

पुढील अंदाजपत्रक सादर होईपर्यंत लॉर्ड कर्झन बदलून गेले होते व त्यांच्या जागी लॉर्ड मिन्टो आले होते. लॉर्ड मिंटोच आता इम्पीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष होते. यावेळी लोकांची स्थिती सुधारेल अशा कित्ती तरी गोष्टी गोखल्यांनी सरकारला सुचविल्या.[२१] खुद्द वित्तविषयक सभासदच मिठावरील कर कमी करण्यास उत्सुक होते. आजवर गोखल्यांनी जी भूमिका घेतली होती ती या रीतीने पूर्णत्वाला येणार होती. पण ब्रम्हदेशात तो कर असा दर मणी एक रुपयाच असे तसेच भारतात व्हावे असे गोखल्यांचे मत होते. तसेच जमीनीवरील दुसरे कित्त्येक कर सरकारने रद्द केले होते. जिल्हा व लोकल बोर्डाकडून प्रान्तासाठी कांही कर घेत त्यात आता सुट मिळणार होती. या बाबतीत जिल्हा बोर्डांना येणा-या तुटीइतकीच सूट असावी, असे गोखले यांचे म्हणणे होते.

सुवर्ण गंगाजळीचा वापर करण्याविषयी सुध्दा गोखल्यांनी सरकारला एक सूचना केली होती. त्यांचे म्हणणे असे की अडीच टक्के दराच्या इंग्लंडमधील कर्जरोख्यात ही गंगाजळीची रक्कम गुंतवून ठेवण्यापेक्षा व साडेतीन टक्के दराने कर्ज घेण्यापेक्षा गरीब शेतक-यांनाच ही रक्कम सरकार कर्जाऊ का देत नाही. ते व्याजसुध्दा जास्त देतील.

लष्कराच्या पुनर्रचनेकडे गोखल्यानी पुन: एकदा लक्ष वेधले. रशियाची भीती संपली होती व अँग्लो-जपान यांचा मित्रत्वाचा करार झाला होता. मध्यपूर्व, अतिपूर्व व स्वदेश येथे युध्दाचा धोका उरला नव्हता. असे असताना प्रत्येक वर्षी लष्कराच्या पुनर्रचनेवर होणारा तीन कोटी रुपये खर्च अनावश्यक असल्याचे त्यानी दाखवून दिले.[२२]

१९०६ सालच्या अंदाजपत्रकांवर टीका करताना ते म्हणाले, "गेल्या आठ वर्षात सरकारी शिल्लक निदान पस्तीस कोटी रुपये असून ती सर्व रक्कम सरकारने रेल्वे बांधण्यावर खर्च केली आहे. शिवाय या कामासाठी वेगळे कर्ज काढले आहे ते निराळेच." लोकांच्या जीवनास आवश्यक अशा कित्येक गोष्टी-वर खर्च करणे किती आवश्यक आहे ते त्यांनी आवर्जून सांगितले. त्यानी विचारले, "रेल्वे म्हणजे सर्व कांही आहे काय ? समाजशिक्षणाला कांहीच महत्व नाही काय ? उत्तम आरोग्यरक्षण हे कर्तव्य नव्हे काय ?"[२३] आपल्या भाषणात सरकारने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी जोराचे प्रयत्न केले पाहिजेत असे आग्रहाने सांगितले. ते म्हणाले, "या देशात जनतेच्या शिक्षणाकडे पूर्वी फारसे लक्ष दिले गेलेले नाही. सरकारने आपली जबाबदारी ओळखून दिरंगाई टाळली पाहिजे. निश्चित ध्येय आणि त्याचा श्रध्देने व उत्साहाने पाठपुरावा याची आज गरज आहे." प्राथमिक शिक्षण मोफत करण्यात यावे अशी त्यांनी सूचना केली. विद्यार्थ्यांच्या फी पासून मिळणारे वार्षिक उत्पन्न फक्त ३०.५ लाख रुपये असल्यामुळे सरकारला त्यासाठी फार मोठे नुकसान सोसावे लागेल असे नाही.[२४]

मिठावरील कर, जमीन महसूल कर, कमी करा, दुष्काळी भागासाठी कायमची उपाययोजना करा, इतर देशाप्रमाणे सैन्यावरचा खर्च कमी करा इ. मागण्या त्यानी मांडल्या. व्हाइसरॉय व अर्थसचीव यांनी मुद्दाम बोलावून घेऊन गोखल्यांचे अभिनंदन केले आणि पुढील कांही वर्षात गोखल्यांच्या

आवडत्या प्रश्नावर म्हणजे मोफत प्राथमिक शिक्षणाबाबत भरीव पावले टाकली जातील असे आश्वासन दिले.[२५]

१९०७ मध्ये, मिठावरील कर दर मणी एक रुपया असावा, ही गोखल्यांची मागणी अखेरीस सरकारने मान्य केली. फक्त या बाबतीत सरकारने जी वागणूक दिली ती गोखल्यांना आवडली नाही. वित्तविषयक सभासद आपल्या अर्थसंकल्पावरील भाषणात म्हणाले की, सार्वजनिक हितसंबंधाच्या खर्चाच्या वाटयात मिठावरील करामुळेच गरीब लोक आपला वाटा उचलू शकतात. गोखल्यांनी लगेच उत्तर दिले की हे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून आहे. जमीन महसूल, अबकारी उत्पन्न कापडावरील अंतर्गत कर, स्टॅम्प ड्यूटी, जंगल कर वगैरे उत्पन्न सरकारला गरीब जनतेकडूनच मिळते. गरीब जनता फक्त प्राप्तीवरील कर एवढा एकच कर भरीत नाही.

अर्थसंकल्पावरील आपल्या भाषणात, रेल्वेच्या जमाखर्चात नुसती फायद्याची नोंद न करता, येणे व देणे वेगवेगळे दाखविलेला ताळेबंद त्यात असावा, असे गोखल्यांनी प्रतिपादन केले होते. गोखल्यांची ही सूचना स्वीकृत झाली. रेल्वेप्रमाणेच पाटबंधारे खात्याचा जमाखर्चही याच पद्धतीने वेगळा दाखवला जावा असे गोखल्यांचे म्हणणे होते. पण ते म्हणणे मान्य झाले नाही. सरकारी शिल्लक, कर्जफेडीसाठी किंवा रेल्वेसाठी वापरणे गोखल्यांना मुळीच मान्य नव्हते. त्यांनी सरकारला बजावले की अनुत्पादक कर्ज भिण्याइतके जास्त मुळीच नाही. त्या सालच्या अंदाजपत्रकांत टांकसाळीतून होणाऱ्या फायद्याचा खर्च कशावर करायचा हा महत्त्वाचा मुद्दा होता. सरकारचे या बाबतीतले धोरण निश्चित नव्हते. १९०६ मध्ये वित्तविषयक सभासद म्हणाले होते की, आज ना उद्या रुपयांचे पौंड करून घेणे आवश्यक ठरेल, या बाबतीत सरकारने आपले धोरण स्पष्ट करावे, असे गोखल्यांचे म्हणणे होते.

गोखल्यांनी केलेल्या अनेक सूचनांत लष्कर पुनर्रचनेच्या खर्चात पंचाहत्तर लक्ष रुपयांची कपात करणे ही एक होती. अफूचा व्यापार बंद करणे ही

दुसरी गोष्ट होती आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची घोषणा ही होय. लष्करी खर्चावरील कपातीमुळे गोखल्यांची फार दिवसांची मागणी मान्य झाली. अफूसारखा अंमली पदार्थ केवळ चीनमध्ये विकण्यासाठी म्हणून तयार करण्याची कल्पनाच गोखल्यांना मान्य नव्हती. ते म्हणतात, "चिनी जनतेला व्यसनाच्या व दारिद्र्याच्या खाईत लोटून देणारे हे अफूचे उत्पन्न मुळी मला मान खाली घालावयास लावणारे वाटते."[२६] १९०८-चा अर्थसंकल्पही शिलकी होता. पण त्या वर्षी अर्थव्यवस्था चिंता करण्या योग्य झाली होती. एक समिती नेमून पदार्थांच्या किंमती कां वाढत आहेत, सरकारचे धोरण केवळ वरवरचे आहे काय, वगैरेचा नीट अभ्यास करून विचार व्हावा असे वाटू लागले होते. गोखल्यांनी देशाच्या आर्थिक परिस्थितीचा बारकाईने अभ्यास केला. चलनविषयक धोरण आणि आयातनिर्यात व्यापाराची परिस्थिती या सर्वांचा त्यांनी विचार केला. त्याचे असे ठाम मत झाले की, आकस्मित चलन-वाढीमुळे वस्तूंच्या किंमती वाढणे अपरिहार्य आहे. व्यापार वाढत असल्यामुळे अधिक चलनाची गरज आहे, हे मत त्यांना मान्य नव्हते. आपले म्हणणे त्यांनी आकडेवारीने सिध्द केले. चलनवाढ झाली की किंमती वाढतात हे त्यांनी सिध्द केले. पण ही हानी येथेच थांबत नाही. यामुळे निर्यात घटते व आयात वाढते. दुसरी एक गोष्ट त्यानी दाखवून दिली ती म्हणजे, कांही सोने प्रसारात असेल ते देशाबाहेर जाईल. वस्तूंच्या उत्पादन-किंमतीत वाढ होवून त्याना परदेशी वस्तूंशी स्पर्धा करता येत नाही.

१९०९ हे साल अत्यंत घडामोडीचे होते. शिलकी अर्थसंकल्पाचे युग संपण्यास सुरवात झाली होती. जुन्या राज्यघटनेचे ते अखेरचे वर्ष होते. मोर्ले-मिंटो सुधारणा १९१० पासून अंमलात येणार होत्या.

वित्त सभासद सर गाय फ्लीटवुड विल्सन यांनी थोड्याशा शिलकीचा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अर्थसंकल्प मांडला असला तरी हे वर्ष फार तुटीचे आहे, असेच गोखल्यांचे मत होते. पाऊस चांगला पडेल हा अंदाज धरून त्यांनी कांही उत्पन्न गृहीत धरले होते. परंतु गोखल्यांच्या मते हा केवळ आशावाद होता. त्यांच्या मते आजवर कधी न झालेली एवढी म्हणजे साडेपांच कोटी रुपयांची तुट या वर्षी येणार होती. करात सवलती दिल्यामुळे ही तूट येणार होती. हे म्हणणे गोखल्यांनी खोडून काढले. मिठावरील कर दर मणी एक रुपयांवर आणणे, जमीन महसुलात कांही सुट देणे, प्राप्तिकराची किमान मर्यादा ५००/- रु. वरून १,०००/- रुपयावर नेणे, यामुळे उत्पन्नात तुट येत होती, ही गोष्ट खरी, पण ती किती होती तर केवळ चाळीस लक्ष रुपये. यामुळे करांच्या सवलतीमुळे अर्थसंकल्पात साडेपाच कोटी रुपये तुट येते हे गोखल्यांना मान्य नव्हते.

अर्थसंकल्पातील तुटीचा व वाढत्या महागाईचा गोखल्यांनी पूर्ण विचार केला. त्यानी असे दाखवून दिले की, लष्कराच्या पुनर्रचनेचा खर्च सरकारने थांबवला असला तरी तो चार वर्षे चालूच होता. शिवाय त्या योजनेमुळे लष्करावरील खर्चात वार्षिक पंधरा लाख पौंडाची वाढ झाली होती. वस्तूंच्या किंमतीचा विचार करता त्यांना असे आढळले की, किंमती तीन गोष्टीवर अवलंबून असतात. एक चलनवाढ, दुसरी गरज व तिसरी पुरवठा आणि एकीमुळे होणारी भाववाढ दुसऱ्या दोन गोष्टी रोखू शकतात.

शिलकी गंगाजळीचा विचार करतांना गोखले म्हणाले, "आपण या संबंधात मोठ्या पेचप्रसंगात सापडलो आहोत. नवे रुपये पाडले नाहीत तर टांकसाळीला फायदा मिळणार नाही व गंगाजळीत भर पडणार नाही. आणि नवे रुपये पाडणे चालू ठेवले तर चलनवाढ होऊन भाव आणखी वाढतील व त्याचा निर्यात व्यापार घटणे व आयात वाढणे असा परिणाम होवून आपला व्यापारातला समतोलच ढासळेल. यावर उपाय म्हणून त्यानी असे सुचविले की, टांकसाळीतून रुपये पाडण्याऐवजी सरकारने सोन्याची नाणीच पाडावी.[२७]

१९०९ मध्ये झालेल्या राज्यसुधारणा १९१० साली अंमलात येवून कायदे-

मंडळाच्या कामकाजाचे स्वरूप थोडेसे बदलले. अंदाजपत्रक प्रथम विभागश: व नंतर साकल्याने चर्चिले जावू लागले. बिनसरकारी सभासदांना महत्त्वाच्या विषयावर ठराव मांडण्याची सवलत मिळाल्याने गोपाळरावांनी पुष्कळ ठराव मांडले. दुस-या सभासदांच्या कित्येक ठरावांना दुजोरा दिला. स्वत:च्या ठरावावरील व दुजो-याची अशी त्यांची बरीच महत्त्वाची भाषणे उपलब्ध आहेत. त्यांच्यातील मुख्य सूत्र एकच आढळते. खर्च कमी करावा, जी राहील ती शिल्लक शिक्षण, आरोग्य, प्रजेला औषधोपचाराची मदत यासाठी खर्च करावी.[२८]

१९०९ च्या अर्थसंकल्पात ज़िचा केवळ संभव होता ती भीती १९१० च्या अर्थसंकल्पात सार्थ ठरली. उत्पन्नाच्या आणि जमेच्या बाबी अनिश्चित बनल्या होत्या. व खर्चाच्या बाबी फुगल्या होत्या. त्यापूर्वीच्या तीस वर्षांच्या परिस्थितीचा गोखल्यांनी धावता अभ्यास केला. त्याना पुढील गोष्टी आढळल्या. १८९८ ते १९०७ पर्यंत अर्थसंकल्प शिलकी होते. कारण इंग्लंडच्या व्यवहारात हुंडणावळीच्या दरामुळे मिळणारा फायदा, अफूच्या व्यापारातील फायदा, देशातील करांच्या उत्पन्नातील वाढ आणि रेल्वेच्या उत्पन्नातील वाढ यामुळे ही शिल्लक होती, असे त्यांना आढळले. लोकांना करात जी सुट दिली होती ती केवळ किरकोळच होती. पण लष्करावरचा खर्चच अवाढव्य वाढला होता व सर्व चिंतेचे कारण तो खर्चच होता. म्हणून सर्वत्र कपात करण्याचे धोरण सरकारने स्विकारावे, खर्चात कपात केली नाही तर भविष्यकाळ कठिण आहे असे गोखल्यांनी बजावले. अफूचे उत्पन्न हळूहळू कमी होवून अखेरीस बंद होणार आहे, ही गोष्ट त्यांनी सरकारच्या नजरेस आणली.[२९]

१९११ साली अर्थसंकल्पावर भाषण करण्यासाठी गोखल्यांना केवळ वीस मिनिटे वेळ देण्यात आला होता. त्यामुळे त्यांचे त्या वर्षीचे भाषण तपशीलवार होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांनी यावेळी प्रामुख्याने दोन गोष्टीकडे सरकारचे लक्ष वेधून घेतले. एक म्हणजे ब्रह्मदेशाचे अंदाजपत्रक आणि दुसरी गोष्ट

म्हणजे प्रांत व मध्यवर्ती सरकार यांचे आर्थिक संबंध. ब्रम्हदेशाच्या प्रश्नाचा आज आपल्याशी कांही संबंध नाही. ब्रम्हदेश त्या वेळी भारताचा एक प्रांत होता. पण त्या वेळी प्रांतांना कांही महत्व नव्हते. कारण त्यांना खरे अधिकार नव्हते. नेहमी प्रांत व मध्यवर्ती सरकार यांच्यात रस्सीखेच चालू असे. मध्यवर्ती सरकार कर बसवू शकत असे, पण प्रांताना ते अधिकार नव्हते. मध्य-वर्ती सरकारही पूर्ण स्वतंत्र नव्हते, त्याला भारतमंत्र्याच्या मर्जीनुसार कारभार करावा लागत असे. कांही उत्पन्न मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार विभागून घेत. मध्यवर्ती सरकारचे सर्व उत्पन्नावर नियंत्रण असल्यामुळे ते देईल त्या उत्पन्नावर प्रांतिक सरकारांना कारभार करावा लागे आणि त्यासाठी देखील मध्यवर्ती सरकार देईपर्यंत वाट पाहावी लागे.

विकासाची कामे प्रांतिक सरकारांना करावी लागत. पण उत्पन्नाचा फार मोठा वाटा मध्यवर्ती सरकार घेत असे. गोखल्यांचे म्हणणे असे की, उत्पन्नाचा एक चतुर्थांश किंवा एक तृतीयांश भाग प्रांतिक सरकारांनी, मध्य-वर्ती सरकारांत भरावा व उरलेला स्वत:साठी ठेवावा.[३०]

याशिवाय सरकारी व बिनसरकारी अधिकाऱ्यांची एक संयुक्त समीती नेमून नागरी व लष्करी खर्चात झालेल्या वाढीची चौकशी करावी, अशीही मागणी ना. गोखले यांनी केली.[३१] १९१२ मधील अर्थसंकल्पावर गोखल्यांनी छोटेसे भाषण केले. सर जेम्स मेस्टन व सर गाय फ्लीटवुड विल्सन यांच्या कार्याचा त्यांनी फार गौरव केला. नवी राजधानी दिल्ली होणार असल्यामुळे कलकत्त्याबद्दल ते फार भावनावशतेने बोलले. अर्थव्यवहाराच्या बाबतीत गोखल्यांनी एकच सूचना केली. ती म्हणजे अपूरे उत्पन्न बुडणार असल्यामुळे नव्या उत्पन्नाच्या बाबी शोधण्यासाठी एक रॉयल कमिशन नेमावे.[३२]

### १८७५ ते १९१४ त्या कालखंडातील लोकवित्ताचे स्वरूप :

गोखले यांनी १८७५ ते १९०८-०९ या कालखंडातील भारताच्या

लोकवित्ताच्या स्वरुपाचा अगदी बारकाईने अभ्यास केला होता. सरकारचा खर्च आणि मिळकत या दोन्ही बाबतीत झालेल्या वाढीच्या तौलनिक अभ्यासासाठी गोखले यांनी वरील कालखंडाचे चार प्रमुख भाग पाडले. त्यानी काढलेल्या निर्णयाचा सारांश खालील कोष्टकात दिला आहे.

कोष्टक क्र. १

राजस्व आणि व्यय यांमध्ये दिसून आलेल्या वाढीचे वार्षिक सरासरी आकडे

| अ.नं. | काल | वार्षिक सरासरी वाढ | |
|---|---|---|---|
| | | राजस्व | व्यय |
| १. | १८७५ - १८८४ | १.२५ टक्के | ०.६७ टक्के |
| २. | १८८४ - १८९४ | १.५ टक्के | १.५ टक्के |
| ३. | १८९४ - १९०१ | १.५ टक्के | १.५ टक्के |
| ४. | १९०१ - १९०९ | २.० टक्के | ५.० टक्के |

वरील कोष्टकावरुन ही गोष्ट सहज लक्षात येते की जमेच्या बाजूस होणाऱ्या वाढीपेक्षा खर्चाच्या वाढीचा वेग अधिक आहे. खरे पाहता राज्य - सरकारच्या नेमून दिलेल्या कार्याच्या चौकटीत जमा आणि खर्च या दोन्ही बाजूत समतोल राखणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे ज्यावेळी देशातील सर्वसामान्य लोकांना आपली मिळकत आणि खर्च यांची तोंड मिळवणी करणे अवघड होवून बसते. त्यावेळी सरकारच्या शिलकी अंदाजपत्रकांना कांहीच अर्थ उरत नाही.[33] गोखले यांनी ज्या कालखंडाचा विशेष बारकाईने अभ्यास केला, त्याचे प्रमुख भाग पुढीलप्रमाणे करता येतील.

१) १८९८-९९ पूर्वीच्या आर्थिक ओढाताणीचा काळ, २) १९०७-१९०८ पर्यंतचा शिलकी अर्थसंकल्पाचा काळ, ३) १९०८-१९०९ नंतरचा सरकारी खर्चात झालेल्या भरमसाठ वाढीमुळे उत्पन्न झालेल्या तुटीच्या अर्थव्यवस्थेचा काळ.

अर्थातच प्रत्येक कालखंडात गोखले यांनी आर्थिक सुधारणांसाठी व विकासासाठी ज्या योजना स्विकारल्या व त्यासाठी जे युक्तीवाद मांडले त्यामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार त्यांनी योग्य ते थोडेफार बदलही केलेले दिसून येतात. शिलकी अर्थसंकल्पाच्या काळात सरकारी अर्थनीती ठरविण्यात गोखले यांचा फार मोठा हात होता आणि याच संदर्भात १९०६ साली त्यानी अर्थसंकल्पावरील आपल्या भाषणात मांडलेल्या योजना लक्षात घेतल्या पाहिजेत.

आपल्या भाषणात त्यांनी पुढील योजना मांडल्या -

१) भूमिकरावरील ओझे २५ ते ३० टक्क्यांनी कमी करणे,

२) भारतीय शेतक-यांना कर्जमुक्त करण्यासाठी दहा लाख पौंड रकमेचा निधी उभारणे. कर्जापायी जमीन विकून टाकण्याच्या प्रवृतीत दिसून आलेली भरमसाठ वाढ, ही स्वतःच्या मालकीची जमीन स्वतः करणा-या शेतक-यांची संख्या कमी होण्याचीच चिन्हे होत, या मुद्दावर त्यांनी भर दिला. त्यांनी असेही सुचविले की, ३।। टक्के भांडवलावरील व्याजासाठी व एक टक्का भांडवलाच्या परतफेडीसाठी अशा हिशोबाने भूराजस्वात ४।। टक्के वाढ करुन वसुली करावी आणि भांडवलाच्या परतफेडीची मुदत ५० वर्षांपर्यंत वाढवावी.

३) इजिप्शियन पध्दतीच्या कृषि बँका सुरु करुन देशांत सहकारी पतपेढयांच्या कार्यास चालना देणे,

४) खाजगी कॉंट्रॅक्टदारांच्याद्वारे पाटबंधारे योजना अंमलात आणणे,

विकासयोजना आणि शिक्षणप्रसार स्थानीय तज्ज्ञांच्या मदतीने करणे,

५) औद्योगिक आणि तांत्रिक विषयांच्या शिक्षणप्रसारास उत्तेजन देणे व त्यासाठी अधिक खर्चाची तरतूद करणे,

६) कालान्तराने सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था करणे,

७) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराची आर्थिक बाजू बळकट करणे.

निरनिराळ्या करासंबंधी गोखले यांचे विचार :

श्री. गोखले यांचे व्यक्तिगत करासंबंधीचे विचार समजून घेण्यासाठी आधी त्यांनी प्रतिपादिलेला एक सामान्य सिध्दांत लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांच्याच शब्दांत हा सिध्दांत पुढीलप्रमाणे मांडता येईल. "करवाढ ही वस्तूंच्या खपात होणाऱ्या वाढीवर आकारली जावी. हीच सर्वात उत्तम आणि फलप्रद करनीती होय. त्याबरोबरच कराची पातळी जसजशी उंचावत जाईल तसतसा कराचा दर कमी करावा."

भारतीय अर्थनीतीत लोकवित्ताचे स्थान लक्षात घेऊनच गोखले यांनी व्यक्तिगत करासंबंधी आपली मते मांडली आहेत.

पुढारलेल्या राष्ट्रांच्या अनुभवाचा फायदा घेवून भारतीय राज्यकारभार चालवावा अशी गोखले यांची मनीषा होती आणि म्हणूनच व्यक्तिगत करांचे विश्लेषण करताना ते नेहमी भारताची इतर राष्ट्राशी तुलना करीत असत. त्यांच्या आंतरराष्ट्रीय तौलनिक अभ्यासाची कल्पना त्यानी पुढील कोष्टकात वापरलेल्या आकडेवारीवरुन येते.[३४]

कोष्टक क्र.२

फ्रान्स आणि भारत या राष्ट्रातील उत्पन्नाच्या व खर्चाच्या काही महत्त्वाच्या बाबी

| देश | एकूण उत्पन्नापैकी शेतसारा | मिठांवरील कर (देशाच्या दैनिक उत्पन्नाच्या प्रमाणात) | शिक्षणावर दरडोई खर्च |
|---|---|---|---|
| फ्रान्स | ४.८ टक्के | अर्ध्या दिवसाचे उत्पन्न | ५ शि. ४ पेन्स |
| भारत | १५.२५ टक्के | दोन दिवसाचे उत्पन्न | ० शि. ११ पेन्स |

वरील तुलनात्मक आकड्यावरून भारतातील ब्रिटिश राजवटीच्या वसाहतवादी स्वरूपाचे यथार्थ दर्शन घडते.

शेतसारा ही राजस्वातील महत्त्वाची बाब होती. ह्या शेतसाऱ्याचे प्रमाण कमी व्हावे असे गोखले याना तीव्रतेने वाटत असे. जमिनीच्या कायम धारेबंदीची अथवा धारेबंदीचा वारंवार फेरविचार करण्याची नीतीही त्याना मान्य नव्हती. शेतकऱ्याला मिळणाऱ्या उत्पन्नातील आपला हिस्सा सरकारने जरूर घ्यावा असे ते म्हणत, परंतु हे करण्याआधी शेतकऱ्यांना संपन्न करण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत असा त्यांचा आग्रह असे. त्यांचे असे स्पष्ट मत होते की, शेतसारा आणि अप्रत्यक्ष कर यामुळे करांचा बोजा प्रामुख्याने गरिबावरच पडतो. परदेशातून येणाऱ्या कापडावरील आयात करामुळे परदेशी व देशी कापडाच्या किंमतीत पडणारी तफावत भरून काढण्यासाठी सरकारने देशात उत्पन्न होणाऱ्या कापडावर अबकारी कर बसविला आहे. ह्या करांचा बोजा नेहमीच गरीबावर पडतो आणि दुसरे म्हणजे देशी कापड उद्योग धंद्याला

त्यामुळे पुरेसे संरक्षण मिळत नाही. प्राप्तीवरील कर कमी करण्यास किंवा करात सूट देण्याची मर्यादा वाढविण्यास असलेला त्यांचा विरोध वरील विचाराशी सुसंगत असाच आहे. सैन्यावर व विदेशी नोकरांवर केला जाणाऱ्या अफाट खर्चावर त्यांनी कडाडून टीका केली. देशाच्या आर्थिक विकासासाठी आणि शिक्षणप्रसारासाठी सरकार कांहीच खर्च करीत नाही. यावरही त्यांनी राष्ट्रवाद्यांना साजेशी विधायक टीका केली.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रवृतीचे विश्लेषण :

राष्ट्रीय दृष्टीकोनातून अर्थकारणाचा विचार करण्याची परंपरा न्याय मूर्ती रानडे ह्यांनी सुरु केली. ज्या वेळी सार्वत्रिक व्यावसायिक अनिर्बं... समर्थन केले जात होते त्यावेळी अर्थनीतीला राष्ट्रीय दृष्टी देण्यात रान... यांनी महत्त्वाचे कार्य केले. १९०० ते १९०८ पर्यंतचा काळ जादा... न्नाचा व वाढत्या आयात व निर्यातीचा काळ म्हणून ओळखला जातो ... आणि हीच समृध्दीची लक्षणे होत असे मानले जात असे. परंतु गोखले यांचे ... असे होते की, गतिहीनता भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थायी लक्षण होवून बसले ... व जी थोडीफार हालचाल दिसते ती केवळ पावसाच्या कमी अधिक प्रमाणामुळे शेतीच्या उत्पन्नात पडणाऱ्या फरकाचा परिणाम आहे.

राष्ट्रीय उत्पन्नाची वार्षिक आकडेवारी तयार करण्याबाबत अलिकडे जे विशेष संशोधन झालेले आहे त्यावरुनही गोखले ह्यांच्यावरील मतांना पुष्टी मिळते. उदा. १९०७-०८ सालचे दरडोई उत्पन्न १९०१-०२ सालच्या दरडोई उत्पन्नाच्या मानाने फारच कमी आढळते. ह्या काळांत लोकांचे खर्च वाढले, परंतु उत्पन्न मात्र तेवढेच राहिले.

आपल्या मताच्या समर्थनार्थ श्री. गोखले यांनी केवळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकड्यावरच भर दिलेला नसून, त्यांनी विविध प्रकारच्या निर्देशांकांचा व

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KO...

सूचकांचाही वापर केला आहे. १८८४ नंतर दिवसेदिवस मृत्यूचे प्रमाण हळूहळू वाढत असल्याचे त्यांनी निश्चयपूर्वक सांगितले. निरनिराळ्या प्रांतामध्ये लागवडीखाली आणलेली जमीन हळूहळू कमी होत असल्याचे त्यांनी दाखवून दिले.

वरील गोष्टी लक्षात घेवून श्री. गोखले यांनी शिलकीचे अर्थसंकल्प आणि आयात-निर्यातीचे आकडे हे समृद्धीचे निदर्शक नसल्याचे सिद्ध केले. त्यांच्या मते देशाच्या अर्थसंकल्पापेक्षा सर्वसामान्य माणसाच्या कौटुंबिक बजेटातून दिसून येणारी परिस्थिती ही सर्वात महत्वाची होती. परदेशी हितसंबंधाचा भारतीय अर्थव्यवस्थेत जास्तीत-जास्त शिरकाव होणे ही गोष्ट तितकीशी महत्त्वाची नसून देशांतर्गत उत्पादनवाढ होणे हे अत्यंत आवश्यक होते. [३५]

## गोखले यांचे तत्कालीन यश :

अनेक बाबतीत आपले विचार सरकारला पटवून देण्यात गोखले यांना यश न येणे अपरिहार्य होते. खरे पाहता ज्या सुधारणांचा राष्ट्राच्या आर्थिक जीवनांवर व्यापक परिणाम झाला असता त्या सुधारणा सरकारने कधीच मान्य केल्या नाहीत. त्या सुधारणांचे स्वरूपच असे होते की, शोषणाच्या परंपरेत वाढलेल्या राजवटीला त्या पूर्णांशाने मान्य होणे कधीही शक्य नव्हते. तथापि श्री. गोखले यांचा अर्थकारणातील अधिकार ब्रिटिश सरकारनेही मान्य केला होता आणि त्यांनी सुचविलेल्या किती तरी सुधारणा सरकारने अंमलात आणल्या होत्या. "गोखले आणि सुधारणा" ह्या ग्रंथात श्री. व्ही.जी. काळे यांनी गोखल्यांनी मिळविलेल्या यशाचे वर्णन केले आहे. गोखले यांनी मांडलेल्या जनतेच्या मागण्या कांही अंशी १९०७-०८ सालच्या अर्थसंकल्पात स्वीकारलेल्या दिसून येतात. मिठावरील कर कमी करण्याच्या मागणीला आलेले यश श्री.काळे यांनी पुढील शब्दात वर्णिले आहे.

"मिठावरील कर आणखी कमी करून, ब्रम्हदेश व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत मणास एक रुपया याप्रमाणे सारखाच कर आकारण्यात येऊ लागला.

१९०३–०४ साली पहिल्यांदा कर कमी करून मणास दोन रुपये असा दर ठरविण्यात आला. १९०५–०६ साली हा कर आणखी कमी करून प्रत्येक मणापाठीमागे १.५० रु. कर आकारण्यात आला. त्यामुळे मिठाचा खप खूपच वाढला. १९०३–०४ साली ९,६८,००० मणांवरून १९०४–०५ साली १५,९७,००० मणापर्यंत खप वाढला. १९०५–०६ साली मिठाचा खप १२,३२,००० मण आटळून आला. कर कमी करण्यासाठी अंमलात आणलेल्या आणखी कांही उपयांमुळे १९०७–०८ साली मिठापासून मिळणाऱ्या उत्पन्नात १९० लाख रुपयांचे नुकसान झाले असावे. सैन्याच्या पुनर्घटनेच्या योजनेवर दरवर्षी २० लक्ष पौंड खर्च व्हावयाचे होते. त्या खर्चातही ५ लाख पौंडाची कपात करण्यात आली.

दुष्काळनिवारणाच्या कामी स्थानिक संस्थांना व प्रांतीय सरकारांना मदत करण्यासाठी एक निधी उभारण्याची योजना आखण्यात आली. केंद्रीय सरकारांत एक गंगाजळी निर्माण करणे हे या योजनेचे मुख्य निर्देशक तत्त्व होते. निधीत जमा असलेल्या रकमेपेक्षा जास्त खर्च झाल्यास तो भागविण्याचीही व्यवस्था या योजनेत केलेली होती.

दरम्यानच्या काळात अफूवरील कर रद्द झाल्याने त्यापासून सरकारला मिळणारे उत्पन्न बुडाले. हा कर रद्द करण्याचे श्रेय श्री. गोखले व ब्रिटिश प्रशासक या दोघांनाही द्यावयास हवे.

१९०७–०८ सालच्या अर्थसंकल्पाच्या वेळी अर्थमंत्र्यांनीकेलेल्या भाषणात असे सांगितले होते की, गेल्या ५ वर्षात निरनिराळ्या करात केलेल्या कपातीमुळे व रद्द केलेल्या उपकरामुळे दरवर्षी राजस्वाचे जवळजवळ ६।। कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर केंद्रीय सरकारच्या उत्पन्नातून दरवर्षी १०५ लाख रुपये पोलीस खात्याच्या सुधारणावर, ८० लाखरु. शिक्षणावर, २४ लाख रुपये शेतीच्या विकासावर आणि जवळजवळ ८० लाख रुपये स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदानाच्या रूपाने खर्च केले जात आहेत."[३६]

## प्रकरण पाचवे

## संदर्भ


१. गोपाळ कृष्ण गोखले, जन्म-शताब्दी अभिवादन, महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र शासन नवी दिल्ली, ९ मे, १९६६, पृ. ८१.

2. Shah A.B. & Aiyar S.P., Gokhale And Modern India Manaktalas Bombay, First Published, 1966, Page.69.

३. साने गुरुजी, नामदार गोखले चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९२५, पृ. ९०.

४. नंदा बलराम, गोपाळ कृष्ण गोखले, ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग, १९८६, पृ. २१६.

५. उक्त, पृ. २१६, २१७.

६. उक्त, पृ. २१७.

७. उक्त, पृ. २१७, २१८.

८. उक्त, पृ. २१८.

९. उक्त, पृ. २१८.

१०. उक्त, पृ. २२०.

११. उक्त, पृ. २२०, २२१.

१२. उक्त, पृ. २२१, २२२.

१३. उक्त, पृ. २२२.

१४. लेखक - देवगिरीकर त्र्यं.रं., अनुवादक - कानिटकर रा.प्र., गोपाळ कृष्ण गोखले, प्रकाशन विभाग माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, मार्च १९७१, पृ. ११०.

१५. उक्त, पृ. ११०, १११.

१६. उक्त, पृ. १११, ११२.

17. Edited by Patwardhan R.P., Ambekar P.V., The Speeches & Writtings of Gopal Krishna Gokhale, Vol.1 Economic, Deccan Sabha Poona-2, 1962, Page No.42

१८. गोखले पु.पा. गोपाळ कृष्ण गोखले, यांचे चरित्र, नीलकंठ प्रकाशन, पुणे-९, प्रथमावृत्ती, १९६६, पृ. ६३.

१९. लेखक - देवगिरीकर त्र्यं.रं., उक्त, पृ. ११२, ११३.

२०. उक्त, पृ. ११३.

२१. उक्त, पृ. ११४, ११५.

२२. उक्त, पृ. ११५, ११६.

२३. उक्त, पृ. ११६, ११७.

२४. कुंझरु पं.-ह्रदयनाथ, गोपाल कृष्ण गोखले, व्यक्ति आणि कार्य, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली, ९ मे, १९६६, पृ. २९.

२५. नगरकर वसंत, भारतीय स्वातंत्र्य संग्राम, प्रेस्टीज प्रकाशन, ४६१/१, सदाशिव पेठ, पुणे, १९८१, पृ. १२३.

२६. लेखक देवगिरीकर त्र्यं.रं., उक्त, पृ. ११७, ११८.

२७. उक्त, पृ. ११९, १२०.

२८. फाटक न.र., आदर्श भारत सेवक, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई-४, प्रथमावृत्ती, १९६७, पृ. १६४, १६५.

२९. लेखक - देवगिरीकर, उक्त, १२१, १२२.

३०. उक्त, पृ. १२२, १२३.

३१. Bakshi S.R. - Gopal Krishna Gokhale, The Moderate Leader. Anmol/Publications, New Delhi, 1991, Page. 181, 182.

३२. लेखक देवगिरीकर उक्त, पृ. १२३, १२४.

३३. गोपाळ कृष्ण गोखले जन्म-शताब्दी, अभिवादन, उक्त, पृ. ८४.

३४. उक्त, पृ. ८५.

३५. उक्त, पृ. ८६, ८७.

३६. उक्त, पृ. ८७, ८८.

......,